# मेट्रो ३ च्या दिनदर्शिकेत जेजेच्या विद्यार्थ्यांची चित्रे



लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या २०१९ च्या दिनदर्शिकेमध्ये काही आकर्षक चित्रे सर्वसामान्य लोकांना पाहायला मिळणार आहेत. आगामी वर्षाची दिनदर्शिका सर्वोत्तम असावी यासाठी एमएमआरसीने 'मुंबई मेट्रो ३ च्या कामकाजाचा आढावा दर्शवणारी चित्रे' या संकल्पनेअंतर्गत जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्सच्या विद्यार्थ्यांसह एमएमआरसीच्या मुख्य कार्यालयात १० डिसेंबर रोजी चित्रप्रदर्शन आयोजित केले होते. मुंबई मेट्रो ३ च्या सर्व पॅकेजची एकूण २० चित्रे या प्रदर्शनात पाहायला मिळाली.

या कार्यक्रमाला एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी हजेरी लावली. उपक्रमात सहभागी झालेल्या जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्समधील १० विद्यार्थ्यांपैकी ९ विद्यार्थी हे चित्रकार तर एक विद्यार्थी शिल्पकार आहे. एकूण १८ पैकी ६ चित्रांची निवड परीक्षक प्रभाकर कोलते, अभय सरदेसाई आणि अंजली गुप्ते यांनी केली. ही सर्वोत्तम ६ चित्रे २०१९ च्या मुंबई मेट्रो ३ दिनदर्शिकेमध्ये झळकणार आहेत. जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्सचे सूरज लोहार आणि आनंद प्रताप या दोघांची चित्रे सर्वोत्तम ठरली.